# वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

वाचा :-१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही/१०९५प्र.क्र.१/९५/बारा/दि.८ जून १९९५.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.३३/९५/बारा दि.१/११/१९९५.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र./एसआरव्ही/१०९६/प्र. क्र. ३३/९५/बारा दि.२०/३/१९९७.
४) शासन निर्णय क्रमांक /वेतन ११९९/प्र.क्र./२/९९/सेवा/३/दि. २०/७/२००१.
५) शासन निर्णय क्रमांक:वेतन-११०६/प्र.क्र.३०/सेवा-३/दि.१०सप्टेंबर,२००७.
६) शासन निर्णय क्रमांक:वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३/दि.१ एप्रिल २०१०.
७) शासन निर्णय क्रमांक:वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३/दि.१ जुलै २०११.
८) पदोन्नती सभा दि. 02/0e/2096 चे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.पाजिप/वित्त/आस्था/वशी/ ८७ /२०१६ दिनांक - ९८/०८/२०१६

**आदेश.**

उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यातील विहीत निकषांची पूर्तता करणाऱ्या गट 'क' वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती /आश्वासित प्रगती योजनेखाली पदोन्नतीतील कूंठितता घालविणेसाठी एकाच पदावरील बारा वर्षाच्या नियमीत सेवेनंतर पदोन्नतीसाखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी मंजूर करण्यांत आलेली आहे. (पहिला लाभ) त्यांना उपरोक्त शासन निर्णय क्र.६ अन्वये पहिल्या लाभानंतर एकाच वेतनसंरचनेत १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांस पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करावयाची आहे.

त्यानुसार खाली नमूद केलेल्या गट क मधील कर्मचाऱ्यांस पहिल्या लाभानंतर एकाच वेतनसंरचनेत १२ वर्षाची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व सदर शासन निर्णयांत नमूद केलेल्या निकषांची पुर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यास त्यांचे पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची (कनिष्ठ लेखा अधिकारी पदाची) वेतनसंरचना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | सध्याचे कार्यालय | पहिल्या लाभांतर्गत मंजूर केलेल्या पदाची वेतन संरचना | दुस-या लाभांतर्गत मंजूर केलेली वरीष्ठ पदाची वेतनसंरचना | वरीष्ठ वेतन संरचना मंजूर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.दिपक गंगाधर तरे | व.स. (लेखा) | पंचायत समिती पालघर | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० | ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२०० | ०१.१२.२०१५ |

**या योजनेअंतर्गत उपरोक्त शासन निर्णयातील तसेच शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेप्रमाणे अटी व शर्ती या आदेशात समाविष्ट कर्मचा-यांना बंधनकारक राहतील. या बाबतीत खालील अटी व शर्तीकडे विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.**

१) या आदेशामुळे कर्मचाऱ्याचे जबाबदारी आणि कर्तव्य यांत वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नतीप्रमाणे वेतन निश्चीतीचा लाभ देण्यांत येईल, मात्र वेतन निश्चीतीचा मिळालेला हा लाभ त्यांच्या वेतनश्रेणीत कार्यात्मक( नियमीत) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही. वेतन निश्चिती खालच्या (विद्यमान) वेतनश्रेणीतील

## वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

वेतनवाढ देय झाल्यानंतर करून घेण्यासंबधीचा विकल्प कर्मचाऱ्यास द्यावयाचा असेल तर असा विकल्प हे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत असा विकल्प न दिल्यास वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन)नियम १९८१ मधील नियम ११ (१)(ए) खाली केली जाईल.

२) जर कर्मचाऱ्यास विशेष वेतन मिळाले असेल तर या योजनेखालील वरीष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर कर्मचाऱ्यास मुळ वेतन श्रेणीत विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

३) या आदेशान्वये कर्मचाऱ्यास पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी मिळाली तरी कर्मचाऱ्याचे नाव कनिष्ठ (मुळ) संवर्गाच्या जेष्ठता सुचित राहील आणि सेवा प्रवेश नियमांतील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळेत नियमीत पदोन्नतीसाठी त्याचा विचार करण्यात येईल. नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यास या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमीत पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास देखील या योजनेचा लाभ मिळणार नाही. या आदेशात समाविष्ट कर्मचाऱ्यांपैकी पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या /पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास विद्यमान पदाचे वेतनश्रेणीत पदावनत करण्यांत येईल. तशा आशयाचे बंधपत्र कर्मचाऱ्याकडून लिहून द्यावे लागेल.

सदरचे आदेशान्वये पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रणी मंजूर केल्याची नोंद संबधीत कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकांत घेण्याची कार्यवाही तसेच संबधीत कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती संबधीत विभागाने, कार्यालयाने करण्याची आहे.

४) संबंधित कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ यापुर्वी देण्यात आला असल्यास त्या कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ या आदेशात नाव असले तरी पुन्हा दिला जाणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

**प्रत** :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. श्री.दिपक गंगाधर तरे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती पालघर यांना माहितीसाठी संबंधिताचे कार्यालय प्रमुखामार्फत रवाना.